**ठळक बातम्या**

- महापालिका निवडणुकांसाठीचा प्रचार आज संपणार असल्यानं सर्व राजकीय पक्षांचा रोड शोवर जोर

- जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांची निवडणूक आज जाहीर होणार

- भटक्या प्राण्यांच्या व्यवस्थापनासंदर्भातल्या दिशानिर्देशांचं योग्य पालन होत नसल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाकडून नाराजी व्यक्त

**आणि**

- ऑपरेशन सिंदूरमध्ये भारतीय सैन्य दलांनी निर्धारित ९ पैकी ७ लक्ष्यं नष्ट केल्याची लष्कर प्रमुखांची माहिती

**<><><><><>**

राज्यातल्या महापालिका निवडणुकांसाठीच्या प्रचाराच्या तोफा आज संध्याकाळी साडेपाच वाजता थंडावतील. राज्यातल्या २९ महापालिकांमधल्या ८९३ प्रभागांमधल्या २ हजार ८६९ नगरसेवकांसाठी परवा मतदान होणार आहे. यासाठी एकूण १५ हजार ९३१ उमेदवार रिंगणात आहे. सकाळी साडे ७ ते साडे ५ वाजेदरम्यान हे मतदान होणार आहे.

प्रचाराचा अखेरचा दिवस असल्यानं सर्व राजकीय पक्षांनी प्रचारावर लक्ष केंद्रीत केलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज नागपुरात रोड शो घेतला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईत रोड शो केला तर अजित पवार पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये रोड शो करत आहेत. राज ठाकरे यांनीही आज पुण्यात प्रचार केला.

**<><><><><>**

मुंबईला कोणीही महाराष्ट्रापासून तोडू शकत नाही. ही निवडणूक मुंबईकर, मराठी माणसाच्या अस्तित्वाची नसून मराठी माणसाच्या मुळावर उठलेल्या विरोधकांच्या अस्तित्वाची आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस म्हणाले. मुंबईतल्या शिवाजी पार्कवर महायुतीच्या प्रचारसभेत ते काल बोलत होते. यावेळी त्यांनी उद्धव आणि राज ठाकरे यांनी एकमेकांवर केलेल्या टीकांचे व्हिडीओ उपस्थितांना दाखवले.

मुंबईबाहेर गेलेल्या मराठी माणसाला मुंबईत आणल्याशिवाय शांत बसणार नाही, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. यावेळी त्यांनी मुंबईतल्या गृहनिर्माण क्षेत्रासाठी केलेल्या विविध उपाययोजनांची माहिती दिली. ठाकरे बंधू स्वार्थासाठी वेगळे झाले आणि स्वार्थासाठी एकत्र झाले याची मुंबईकरांना कल्पना असल्याची टीका त्यांनी यावेळी केली.

<><><><>

नाशिकमध्ये तपोवनात अयोध्येच्या धर्तीवर भव्य श्रीराम मंदिर उभारणार असल्याची घोषणा कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी केली. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काल घेतलेल्या प्रचारसभेत ते बोलत होते. नाशिकमध्ये होऊ घातलेल्या कुंभमेळ्याच्या निमित्ताने केंद्र आणि राज्य शासनाच्या वतीने हजारो कोटींचा निधी उपलब्ध होणार असून, यामुळे नाशिक शहराचा संपूर्ण कायापालट होणार असल्याचं महाजन यांनी सांगितलं.

<><><><>

नाशिक महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षानं ७५ जणांची पक्षातून हकालपट्टी केली आहे. निवडणुकीत पक्षाशी बंडखोरी करून निवडणूक लढवणाऱ्या तसचं उमेदवारी न मिळाल्यानं अन्य पक्षाकडून उमेदवारी मिळवून निवडणूक रिंगणात असलेल्यांचा यात समावेश आहे. यात नाशिक महापालिकेचे माजी सभागृह नेते कमलेश बोडके, सतीश सोनवणे यांच्यासह काही माजी नगरसेवकांचा समावेश आहे.

<><><><>

महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचारादरम्यान कल्याण डोंबिवली मधे भाजपा आणि शिवसेनेच्या कार्यकर्त्यांमधे हाणामारी झाली. यात भाजपा आणि शिवसेनेचे प्रत्येकी दोन पदाधिकारी जखमी झाले आहेत. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

प्रभाग क्रमांक २९ मधे मतदारांना आमिष म्हणून पैसे वाटल्याचा आरोप दोन्ही बाजूंनी केला जात होता, त्यावरून वाद विकोपाला गेला.

<><><><>

लातूर महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचारादरम्यान भाजपाच्या कार्यकर्त्यांना कथितरित्या धमकावल्याप्रकरणी काँग्रेसच्या दोन उमेदवारांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. तसंच मतदारांना मतदान करण्यासाठी आमिष म्हणूून पैसे वाटल्याप्रकरणी

भाजपाच्या उमेदवार आणि दोन कार्यकर्त्यांविरोधातही गुन्हा दाखल झाला असल्याचं पोलिसांनी सांगितलं.

<><><><><>

राज्यातल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीची घोषणा आज होणार आहे. आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा न ओलांडलेल्या १२ जिल्हा परिषद आणि सव्वाशे पंचायत समित्यांमध्ये या निवडणुका होण्याची शक्यता आहे. मुंबईत संध्याकाळी ४ वाजता राज्य निवडणूक आयोग वार्ताहर परिषद घेऊन या निवडणुकांची घोषणा करणार आहे. सर्वोच्च न्यायालयानं कालच या निवडणुकांची प्रक्रिया पूर्ण करायला १५ फेब्रुवारीपर्यंत मुदत वाढ दिली होती.

<><><><><>

रायगड जिल्ह्यातल्या काशीद बीचवर सहलीसाठी आलेल्या दोघांचा काल मृत्यू झाला. अकोला जिल्ह्यातल्या एका खासगी शिकवणी वर्गाची सहल इथं आली होती. त्यातले तिघे जण समुद्रात वाहून गेले, एका जणाला वाचवण्यात यश आलं मात्र दोघे जण वाहून गेल्याचं पोलिसांनी सांगितलं.

<><><><><>

भटक्या कुत्र्यांनी चावा घेतलेल्या व्यक्तींना मोठी नुकसान भरपाई द्यायला लावू असा इशारा सर्वोच्च न्यायालयानं राज्य सरकारांना दिला आहे. गेल्या ५ वर्षात भटक्या प्राण्यांच्या संदर्भात दिलेल्या दिशानिर्देशांची योग्य अंमलबजावणी झाली नसल्याबद्दल न्यायालयानं नाराजी व्यक्त केली. प्राणी प्रेमी आणि त्यांना खाऊ घालणाऱ्यांना या प्रकाराबद्दल जबाबदार धरलं पाहिजे असं मत न्यायमूर्ती विक्रम नाथ, संदीप मेहता आणि एन व्ही अंजारिया यांच्या खंडपीठानं नोंदवलं. भटक्या कुत्र्यांना सार्वजनिक ठिकाणी खाऊ घालणारे नागरिक आणि संस्थांवर सर्वोच्च न्यायालयानं ताशेरे ओढले. त्यांची करुणा ही प्राण्यांपर्यंतच मर्यादित का आहे, माणसांपर्यंत ती का पोहोचत नाहीत, असा प्रश्न न्यायालयानं विचारला. प्राणी प्रजनन नियंत्रण नियमांमध्ये निर्बीजीकरणावर भर दिलेला आहे आणि आक्रमक कुत्र्यांचा प्रश्न किंवा हल्ले होऊ नयेत म्हणून घ्यायची काळजी, यावर हे नियम फार लक्ष देत नाहीत, अशी माहिती ज्येष्ठ वकील अरविंद दातार यांनी सुनावणीदरम्यान दिली. न्यायालयानं या प्रश्नाकडे माणूस विरुद्ध कुत्रे असं बघू नये, तर

पर्यावरणीय समतोल साधण्याच्या दृष्टीनं याकडे बघावं, अशी विनंती ज्येष्ठ वकील विकास सिंह यांनी केली. भटक्या कुत्र्यांची संख्या आटोक्यात ठेवण्यासाठी निर्बीजीकरण हाच एक उपाय आहे, असं मत ज्येष्ठ वकील मेनका गोस्वामी यांनी मांडलं.

<><><><><>

भ्रष्टाचाराच्या प्रकरणात सरकारी कर्मचाऱ्यांची चौकशी करण्यापूर्वी परवानगीची अट बंधनकारक असल्याच्या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयाच्या २ सदस्यीय खंडपीठात एकमत होऊ शकलेलं नाही. भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याचं १७ ए हे कलम असंवैधानिक असून ते रद्द करण्याची गरज न्यायमूर्ती बी व्ही नागरत्ना यांनी व्यक्त केली. तर इमानदार अधिकाऱ्यांचं रक्षण करण्यासाठी हे कलम गरजेचं असल्याचं मत न्यायमूर्ती के व्ही विश्वनाथन यांनी नोंदवलं. २०१८ मध्ये हे कलम आणण्यात आलं होतं. त्याला विरोध करणारी याचिका एका स्वयंसेवी संस्थेनं दाखल केली होती. आता सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत मोठ्या खंडपीठाची नियुक्ती करतील आणि त्यासमोर याप्रकरणी पुन्हा सुनावणी होईल.

<><><><><>

ऑपरेशन सिंदूरमध्ये भारतीय सैन्य दलांनी पाकिस्तानमधली नऊपैकी सात लक्ष्यं नष्ट करून चोख प्रत्युत्तर दिल्याचं प्रतिपादन लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी केलं आहे. ते आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेला संबोधित करत होते. ऑपरेशन सिंदूर हे तिन्ही सैन्य दलांच्या समन्वयाचं उत्तम उदाहरण आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर निर्णायक प्रत्युत्तर देण्याचा निर्णय सर्वोच्च पातळीवर घेण्यात आला होता, असं त्यांनी सांगितलं.

गेल्या १० मे पासून जम्मू आणि काश्मीर आणि पश्चिमी सीमेवरची परिस्थिती संवेदनशील असली तरी ती पूर्णपणे नियंत्रणात आहे. गेल्यावर्षी ३१ दहशतवाद्यांना कंठस्नान घालण्यात आलं, त्यापैकी ६५ टक्के दहशतवादी पाकिस्तानचे होते, अशी माहितीही द्विवेदी यांनी दिली.

<><><><><>

भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरण ट्रायने मुंबई आणि नाशिक इथे मोबाईल नेटवर्कच्या गुणवत्तेचं मूल्यांकन केलं. इंटरनेटचा वेग, कॉल सेटअप, कॉल ड्रॉप या सर्व निकषांवर मूल्यांकन करण्यात आलं. मुंबईत कॉल सेटअपमध्ये रिलायन्स जिओ नेटवर्क

सर्वोत्तम ठरलं. कॉल ड्रॉप निकषावर एअरटेल उत्तम ठरलं. डाऊनलोड गती जिओ सर्वाधिक वेगवान ठरलं.

नाशिक भागात कॉल सेटअप निकषावर जिओने पहिला क्रमांक लावला. कॉल ड्रॉप निकषावर एअरटेल सर्वोत्तम ठरलं असून डेटा डाऊनलोड गती जिओची सर्वाधिक आहे. दोन्ही विभागांमध्ये एमटीएनएल आणि बीएसएनएल या क्रमवारीत सर्वात नीचांकी स्थानावर आहेत.

**<><><><><>**

सूर्याचं उत्तरायण आणि शेतात कापणीला आलेल्या पिकांच्या आनंदाप्रीत्यर्थ देशात सर्वत्र आज उत्सव साजरा केला जात आहे. राज्यात आज भोगीचा उत्साह आहे; तर उद्या संक्रांतीचा सण साजरा होणार आहे. पंजाब, हरियाणा आणि उत्तर प्रदेशातही आज शेकोटी पेटवून, गाणी गात, पारंपरिक पदार्थांचा आस्वाद घेत लोहडीचा सण साजरा केला जातो.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्व देशवासियांना लोहडी, मकर संक्रांत, बिहू आणि पोंगलच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हे सण देशाच्या समृद्ध कृषी परंपरांचे प्रतीक आहेत आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना प्रतिबिंबित करतात, असं त्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

महिला प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत आज मुंबई इंडियन्सचा सामना गुजरात जायंट्सबरोबर होणार आहे. नवी मुंबईच्या डी. वाय. मैदानावर संध्याकाळी साडेसात वाजता सामन्याला सुरुवात होईल.

काल झालेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूनं यूपी वॉरियर्सवर ९ खेळाडू राखून मात केली. १४४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना बेंगळुरूच्या संघानं एक खेळाडू गमावून १२ षटकं आणि एका चेंडूतच १४५ धावा फटकावल्या. ग्रेस हॅरिस हिला सामनावीर म्हणून गौरवण्यात आलं.

**<><><><><>**

इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज व्हाईट हाऊस इथं अमेरिकेच्या अध्यक्षांचे सहाय्यक मायकल क्रात्सिओस यांची भेट घेतली आणि भारतात होणाऱ्या एआय इम्पॅक्ट परिषदेबद्दल चर्चा केली. तत्पूर्वी ते अर्थमंत्री स्कॉट बेसेन्ट यांनी

आयोजित केलेल्या खनिजविषयक बैठकीत सहभागी झाले होते. देशाची उत्पादन क्षमता आणि वेगाने वाढणाऱ्या इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्राची लवचिकता वाढवण्यासाठी महत्त्वाच्या खनिजांच्या पुरवठा साखळ्या मजबूत करणं अत्यावश्यक असल्याचं वैष्णव यांनी समाजमाध्यमावर लिहिलं.

//<><><><><>//